## प्रेस नोट

## ''मांडुळ प्रजातीचा दुर्मिळ सापाची तस्करी करणाऱ्या आंतराज्यीय टोळीमधील चौघांना कफ परेड पोलीस ठाणे कडून अटक''

दिनांक ०७/१०/२०२४ रोजी कफ परेड पो.ठाणे हद्दीमधील मेकर टॉवर जवळ काही इसम हे एक जिवंत मांडूळ प्रजातीचा दूर्मिळ सर्पाची (वन्यजीव) अवैधरित्या तस्करी करून विक्री करण्याकरीता येणार असल्याची गोपनीय माहिती कफ परेड पोलीस ठाणेचे स.पो.नि. अमित देवकर व पो.उ.नि. रुपेश भागवत यांना गुप्त बातमीदारामार्फेत प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने पोलीस पथकाने मेकर टॉवर परिसरात सापळा लावला. मिळालेल्या माहितीनुसार एका पांढऱ्या रंगाच्या मारुती एर्टिगा कार क्रमांक MH 47 BT 2554 मधून चार इसम तेथे आले. त्यांच्या संशयास्पद हालचालीवरुन तसेच गोपनीय बातमीदारांनी दिलेल्या इशाऱ्यावरुन पोलीसांनी एर्टिगा गाडीची तपासणी केली असता गाडीच्या पाठीमागील बाजूला ठेवलेल्या एका बॅगची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यात एक साधारण ५ किलो वजनाचा व ५५ इंच लांबीचा मांडूळ साप (Red Sand Boa) आढळून आला. सदर मांडुळ सर्पास Aarey Key Foundation चे सर्पमित्र गणेश गायकवाड यांच्या मदतीने ताब्यात घेऊन त्यास सुरक्षितेकामी वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग, ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी पोलीस हवालदार श्री. प्रशांत सावंत यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन खालील नमूद आरोपीत इसमांच्या विरोधात कफ परेड पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु. र.क्र. २२१/२४ कलम ३९(३), ४४, ४८(ए), ५१ वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून खालील चारही आरोपींना नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीतांची नावे-

१) नरसिंहा सत्यमा धोटी, वय-४० वर्ष, रा.ठी-नालगोंडा, तेलंगणा

२) शिवा मल्लेश आडप, वय-१८ वर्ष, रा.ठी- यादरी, तेलंगणा

३) रवी वसंत भोईर, वय ५४ वर्ष, रा.ठी- मुलुंड, मुंबई.

४) अरविंद चौतुराम गुप्ता, वय -२६ वर्ष, रा.ठी- मुंब्रा, ठाणे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, डॉ. अभिनव देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-१) श्री. प्रविण मुंढे, सहाय्यक पोलीस आयुक्त (कुलाबा विभाग) श्री. शशिकिरण काशिद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संदीप विश्वासराव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कफ परेड पोलीस ठाणे यांच्या पर्यवेक्षणात स.पो.नि. अमित देवकर, अभिजीत भोसले, पो.उ.नि. रूपेशकुमार भागवत, पो.ह. प्रशांत सावंत, प्रतोद नाईक, पो.शि. प्रविण यादव, पो.शि. मुरली चौधरी, पो.शि.प्रकाश बारी यांनी पार पाडली.


SML